शोधप्रबंधाचा आराखडा

"ग्रामविकासात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे योगदान : एक समाजशास्त्रीय अध्ययन (संदर्भ : नांदेड जिल्हा)"

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड सामाजिकशास्त्रे विद्याशाखेअंतर्गत समाजशास्त्र विषयातील पीएच्.डी.पदवीसाठी सादर करण्यात येणारा शोधप्रबंधाचा आराखडा

संशोधक

प्रेमकुमार माधवराव कौशल्ये

एम.ए. (सेट), बी.एड्.

मार्गदर्शक

प्रा.डॉ.बी.आर.भोसले

सहयोगी प्राध्यापक,

यशवंत महाविद्यालय, नांदेड

संशोधन केंद्र

सामाजिकशास्त्रे अभ्यास संकूल,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

मे २०१९

१.१ प्रस्तावना :-

खऱ्या भारताचे दर्शन खेड्यात होत असल्याने महात्मा गांधींनी 'खेड्यांकडे चला' अशी हाक दिली होती. २०११ च्या जनगणनेनुसार भारतात ६००००० पेक्षा जास्त खेडी आहेत. अर्थातच भारतात ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण अधिक आहे. सन १९५१ मध्ये एकूण लोकसंख्या ३६.१० कोटी होती. त्यात २९.८६ कोटी एवढे ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण होते. सन १९९१ मध्ये एकूण लोकसंख्या ८४.६४ कोटी होती त्यात ग्रामीण लोकसंख्या ६२.८६ कोटी तर सन २००१ ला एकूण लोकसंख्या १०२.८७ कोटी होती त्यामध्ये ७४.२४ कोटी एवढी ग्रामीण लोकसंख्या होती. तर सन २०११ मध्ये ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण ८३.३० कोटी एवढे होते. एकंदरीतच भारतीय लोकसंख्येत ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण खूप जास्त आहे. लोकसंख्या वाढीची समस्या ही ग्रामीण भागात गंभीर रूप धारण करीत आहे. अतिरिक्त लोकसंख्येची समस्या ही अनेक समस्यांची जननी आहे. त्यातून अनेक सामाजिक व आर्थिक समस्या जन्मास येतात. भारतातील बेरोजगारीची समस्या त्याचेच एक अपत्य आहे. लोकसंख्या वृद्धीदराचे प्रमाण जास्त व त्या तुलनेत रोजगारसंधीच्या निर्मितीचा दर कमी या विसंगत स्थितीतूनच बेरोजगारीची समस्या हे भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील प्रमुख आव्हान बनले आहे. सन १९५१ नंतर देशात जन्मदराचे प्रमाण जास्त व मृत्यूदराचे प्रमाण कमी यामुळे 'लोकसंख्या विस्फोटाची स्थिती' निर्माण झाली. सर्वत्र गर्दीचा प्रश्न निर्माण झाला. चीननंतर भारताचा लोकसंख्येच्या दृष्टीने जगात दुसरा क्रमांक लागतो. जगाच्या लोकसंख्येच्या १७.५% लोकसंख्या एकट्या भारताची आहे. त्यामुळे वाढती लोकसंख्या बेरोजगारीचे प्रमुख कारण बनले आहे. ही समस्या आर्थिक विकासातील प्रमुख अडथळा बनला आहे. विशेष बाब म्हणजे वयोगटानुसार लोकसंख्येचे वर्गीकरण केल्यास १४-५९ वर्ष या वयोगटातील लोकसंख्येचे प्रमाण अधिक आहे. ही लोकसंख्या कर्ती किंवा उत्पादक लोकसंख्या मानली जाते. त्यामुळे श्रमबाजारात श्रमाचा पुरवठा किंवा श्रमशक्ती मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. ही विकासाच्या दृष्टीने जमेची बाजू असली तरी या श्रमशक्तीचा विनियोग उत्पादन कार्यात

करण्यास अपयश येत आहे. प्रचलित वेतन दरावर काम करण्याची इच्छा व पात्रता असूनदेखील जर काम करण्याची संधी मिळाली नाही तर त्यास बेकार म्हणतात.

भारतीय संविधानातील कलम ४५ मध्ये १४ वर्ष पूर्ण होईपर्यंत मोफत व सक्तीच्या शिक्षणाची तरतूद आहे. परिणामी त्यास अनुसरून स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाचा प्रचार, प्रसार वाढला. ही बाब सामाजिक विकासाच्या दृष्टीने सकारात्मकच आहे. परंतु ज्या प्रमाणात सुशिक्षितांची संख्या वाढत आहे त्याप्रमाणात रोजगाराच्या संधी अत्यल्प प्रमाणात निर्माण होत आहेत. महाविद्यालये व विद्यापीठे बेरोजगारी निर्माण करणारे कारखाने वाटू लागले आहेत. बेरोजगारीची समस्या ही आर्थिक स्वरूपाची असली तरी त्यातून अनेक सामाजिक प्रश्न निर्माण होतात. त्यामुळे ही एक गंभीर सामाजिक समस्या म्हणूनही अभ्यासली जाते. रिकामं डोकं हे सैतानाचं घर असं म्हटलं जाते. कामाशिवाय वाया गेलेला वेळ हा श्रमाचा नाश करणारा ठरतो. युवाशक्तीमध्ये मोठी ताकद असते. युवक जसे देश घडवू शकतात तसेच ते देश बिघडवूही शकतात. त्यांच्या हातून समाज व देशविघातक कृत्ये घडू नयेत म्हणून त्यांना कामाच्या, रोजगाराच्या संधी उपलब्ध करायला हव्यात. अन्यथा बेरोजगारीतून दारिद्र्य व दारिद्र्यातून नैराश्य व वैफल्य निर्माण होते. तरूणांतील विपथगमनप्रवृत्ती वाढीस लागते. ही बाब समाजासाठी घातक ठरू शकते. याचे गांभीर्य लक्षात घेऊन स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने बेरोजगारी कमी करून विकास घडवण्यासाठी वेळोवेळी विविध योजना, कार्यक्रम आखून त्यांची अंमलबजावणी केली. विशेषतः ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी यातील अनेक योजना उपयुक्त ठरल्या त्या विविध योजना पुढीलप्रमाणे आहेत.

सामुदायिक विकास कार्यक्रम (१९५२), ग्रामीण प्रकल्प कार्यक्रम (१९६१), ग्रामीण रोजगार धडक कार्यक्रम (१९७२), कामासाठी धान्य कार्यक्रम (१९७७), ग्रामीण युवकांसाठी स्वयंरोजगार प्रशिक्षण (१९८९), जवाहर रोजगार योजना (१९८९), आश्वासित रोजगार योजना (१९९३), संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना (२००१) तसेच १९७२ ची मूळ रोजगार हमी योजना नवीन स्वरूपात ग्रामीण भागातील मजुरांना वर्षातील १०० दिवस रोजगार पुरवणारी राष्ट्रीय

ग्रामीण रोजगार हमी योजना २००६ साली सुरू करण्यात आली. ही योजना इतर योजनापेक्षा वेगळी, महत्त्वाकांक्षी आहे. गावाच्या विकासासाठी ज्या ज्या कामांची आवश्यकता आहे. जसे शेततळे, रस्ते, विहिरी, फळबागा, बगीचा, रोपवाटिका, रस्त्याच्या दुतर्फा झाडे, खतनर्मितीसाठी खड्डा, क्रीडांगणे, शौचालये इ. कामे या योजनेअंतर्गत केली जातात. गावाने ज्या कामाची मागणी ग्रामसभेद्वारे केली त्यासाठी शासनाकडून निधी उपलब्ध करून दिला जातो. विकेंद्रीकरणानुसार स्वतःच्या गावाच्या विकासात्मक कामाचे नियोजन करण्याचा अधिकार ग्रामसभेला देण्यात आला आहे. स्त्री-पुरुष मजुरांना कामाचा मोबदला समान दराने देणारी ही योजना गावातील दुर्बल घटकांच्या विकासातही मोलाची भूमिका बजावताना दिसते. एकंदरीत ग्रामीण भागातील मजुरांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देतानाच त्या गावाच्या विकासाची विविध कामे या योजनेमार्फत केली जातात.

५ सप्टेंबर २००५ ला केंद्रशासनाने संपूर्ण भारतात राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा लागू केला. यामुळे देशातील ग्रामीण कुटुंबाना वित्तीय वर्षात १०० दिवस प्रतिकुटुंब अकुशल रोजगाराचा हक्क प्राप्त झाला. या राष्ट्रीय कायद्याची अंमलबजावणी २ फेब्रुवारी २००६ पासून टप्प्याटप्प्यने सुरू होऊन दिनांक १ एप्रिल २००८ पासून ही योजना देशातील सर्व जिल्ह्यात लागू केली. ३१ डिसेंबर २००९ मध्ये राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेला महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना असे नाव देण्यात आले. सारांश, रोजगारनिर्मिती बरोबरच ग्रामीण भागाच्या विकासात या योजनेचे काय योगदान आहे? याची पडताळणी प्रस्तुत संशोधनातून केली जाणार आहे.

१.२ संशोधन विषयाची निवड :-

कोणत्याही देशाला बेरोजगारी व ग्रामविकासाची समस्या असणे परवडणारे नसते. कारण त्याचे दुष्परिणाम सामाजिक, आर्थिक इ. क्षेत्रावर होताना दिसतात. देशाच्या आर्थिक विकासामध्ये ग्रामविकास एक प्रमुख आव्हान आहे. बेरोजगारीतून दारिद्र्य व दारिद्र्यातून पुन्हा

बेरोजगारी हे एक दुष्टचक्र आहे. आपल्या किमान गरजा पूर्ण करण्याइतपत जर उत्पन्न मिळत नसेल किंवा ते मिळवून देणारी रोजगाराची संधी मिळत नसेल तर त्या व्यक्ती किंवा कुटुंबाचा कल निश्चितच गुन्हेगारी प्रवृत्तीकडे वळतो. पोटाची भूक भागवण्यासाठी बेरोजगारांकडून समाज व देशविघातक कृत्ये घडण्याची शक्यता असते. म्हणून रोजगाराच्या जास्तीत जास्त संधी निर्माण करून वाढत्या बेरोजगारीला आळा घातला पाहिजे. या कामी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची भूमिका तपासून पाहण्यासाठी प्रस्तुत संशोधन विषयाची निवड योग्य ठरते.

ग्रामीण समुदायात शेतकरी आत्महत्या, दारिद्र्य, वैफल्यातून व्यसनाधिनता अशा अनेक समस्या दिसून येतात. ग्रामीण अर्थव्यवस्था अक्षरशः कोलमडून पडत आहे. अशा स्थितीत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना एक आशेचा किरण ठरू पाहते का? हे पडताळून पाहणे परिस्थितीपूरक वाटते म्हणून प्रस्तुत संशोधन विषयाची निवड योग्य वाटते.

रोजगारनिर्मितीबरोबरच गावासाठी आवश्यक असलेल्या कामांची दखल घेऊन त्या गावाच्या विकासासाठी ग्रामसभेद्वारे मागणी केलेली कामे पूर्ण करण्याचा उद्देश सदर योजनेचा आहे. त्या अनुषंगाने अध्ययन करण्याच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधन विषयाची निवड योग्य ठरते.

१.३ संशोधन विषयाचे महत्त्व :-

१) रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी शासन स्तरावरून कोणकोणत्या योजना राबवल्या जातात. या अभ्यासासाठी प्रस्तुत संशोधन महत्त्वाचे आहे.

२) 'मागेल त्याला काम' हा बेरोजगारांना मिळालेल्या कायद्यानुसार अधिकार आहे. या अभ्यासासाठी प्रस्तुत संशोधन विषय महत्त्वाचा आहे.

३) ग्रामीण भागातील अकुशल कामगारांना रोजगारांची हमी वास्तविकपणे दिली जाते का नाही? हे पडताळून पाहण्याच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधन विषय महत्त्वाचा वाटतो.

४) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ग्रामीण भागाच्या विकासात विशेषतः महिलांसह लोकसहभाग कसा घेते यादृष्टीने अभ्यासविषय महत्त्वपूर्ण वाटतो.

५) प्रस्तुत योजनेच्या अंमलबजावणीत ग्रामसभेची व ग्रामपंचायतीची भूमिका जाणून घेण्याच्या दृष्टीने संशोधन विषय महत्त्वाचा वाटतो.

६) सर्वप्रथम महाराष्ट्र शासनाने चालू केलेली रोजगार हमी योजना कालांतराने देशभर लागू कशी केली व या योजनेचे स्वरूप बदलून तिचे कायद्यात रूपांतर कसे झाले हे जाणून घेण्यासाठी प्रस्तुत संशोधन विषय महत्त्वाचा वाटतो.

७) रोजगार निर्मिती बरोबरच ग्रामीण भागात पायाभूत सुविधा व नैसर्गिक साधनसंपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित सार्वजनिक बांधकामे व दुर्बल घटकांकरिता व्यक्तिगत मत्ता (जसे शेततळे, विहिरी, फलोत्पादन इ.) निर्माण करण्यात किती यश प्राप्त झाले हे संशोधन विषयावरून लक्षात येते.

१.४ प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्ट्ये :-

१) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीमध्ये स्थानिक स्वराज्य संस्था व जिल्हाधिकारी कार्यालय यांची भूमिका जाणून घेणे.

२) ग्रामीण रोजगार निर्मितीबरोबरच वैयक्तिक लाभाच्या व सार्वजनिक लाभाच्या कामांचा आढावा घेणे.

३) प्रस्तुत संशोधनातून ग्रामीण भागातील मजुरांच्या स्थलांतराची प्रवृत्ती जाणून घेणे.

४) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत नोंदणी केलेल्या (जॉबकार्डधारक) मजुरांना मिळणाऱ्या सोयी-सुविधा कोणत्या त्याचा अभ्यास करणे.

५) रोजगारनिर्मितीसाठी योजनेअंतर्गत हाती घेतलेल्या विविध कामांतून वित्तीय वर्षात किती मनुष्यदिवस निर्मिती होते त्याचा आढावा घेणे.

६) नोंदणीकृत मजुरांना रोजगार प्राप्तीनंतर त्यांच्या आर्थिक स्थितीत व राहणीमानात सुधारणा झाली का? याबाबत माहिती जाणून घेणे.

७) रोजगार निर्मितीसोबतच ग्राम विकासाच्या दृष्टीने प्रस्तुत योजनेअंतर्गत करण्यात येणाऱ्या विविध कामांचा आढावा घेणे.

८) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे स्वरूप समजून घेणे.

१.५ प्रस्तुत संशोधनाची गृहितकृत्ये :-

१) अजूनही ग्रामीण समुदायातील मजुरांचा कल शहरी समुदायाकडे स्थलांतर करण्याकडे आहे.

२) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या व्यापक अंमलबजावणीमुळे ग्रामीण विकासात लोकसहभाग वाढला आहे.

३) 'मागेल त्याला काम' या धोरणामुळे ग्रामीण अकुशल कामगारांना वर्षभरात पुरेसा रोजगार मिळत आहे.

४) रोजगारनिर्मिती बरोबरच ग्रामीण भागात स्थानिक गरजांनुसार नैसर्गिक मत्तानिर्मिती व कृषिविकासास सहाय्यक कामे केली जातात.

५) बेरोजगारांच्या नोंदणी प्रक्रियेसाठी करण्यात येणाऱ्या कुटुंब सर्वेक्षण गटांमध्ये ग्रामपंचायत सदस्य व आदिवासी, दलित व महिला या दुर्बल घटकांनाही सहभाग दिला जातो.

६) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीतून अनेक अडचणी आहेत.

७) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत करण्यात येणाऱ्या विविध कामांमुळे ग्रामविकास घडून येत आहे.

१.६ संशोधन पद्धती :-

ग्रामविकासात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे योगदान या विषयांवर संशोधन करण्यासाठी नांदेड जिल्ह्याच्या संदर्भात तथ्य संकलन करावयाचे आहे. समाजाच्या विकासासाठी शासनस्तरावरून अनेक कल्याणकारी योजना राबवल्या जातात. परंतु या योजनांची यशस्वीता दोन बाबींवर अवलंबून असते. एक म्हणजे योजना ही किती प्रभावी व व्यावहारिक पद्धतीने बनवली व दुसरी बाब म्हणजे योजना कार्यान्वीत करण्यासाठी लोकांचा किती प्रमाणात पाठिंबा व सहकार्य, सहयोग मिळतो. या दोन्ही बाबींकरीता संशोधनातून प्राप्त केलेले ज्ञान अतिशय क्रमबद्ध व व्यवस्थितरित्या प्राप्त करण्यासाठी वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब करावा लागतो, संशोधन विषयाची सत्यता व वस्तुनिष्ठता तपासण्यासाठी वैज्ञानिक पद्धतीचा वापर करणे आवश्यक ठरते. प्रस्तुत संशोधन विषयाचा अभ्यास करण्यासाठी नमूना सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला जाईल.

१.७ संशोधनक्षेत्र व व्याप्ती :-

"ग्रामविकासात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे योगदान : एक समाजशास्त्रीय अध्ययन" हा संशोधनासाठी निवडलेला विषय निश्चितच देश व राज्य पातळीवर अतिशय महत्त्वपूर्ण अभ्यासविषय आहे. ग्रामीण बेरोजगारीला आळा घालण्यासाठी प्रस्तुत योजना देशातल्या २०० जिल्ह्यात राबवली जाते. परंतु संशोधनाच्या दृष्टीने एवढ्या व्यापक प्रमाणात अध्ययन करणे शक्य होत नाही. म्हणून विषयाला न्याय देण्यासाठी व त्यात

वस्तुनिष्ठता आणण्यासाठी 'नांदेड जिल्हा' या अध्ययन क्षेत्राची निवड करण्यात आली आहे. नांदेड जिल्ह्यात एकूण १६ तालुके आहेत. या प्रत्येक तालुक्यातील ५ गावे याप्रमाणे ८० गावांची निवड करून प्रत्येक गावातील ३ घटकांप्रमाणे २४० नमुन्यांची निवड करण्यात येईल.

१.७.१ संशोधनाची व्याप्ती :-

सामाजिक संशोधनामध्ये संशोधनाची व्याप्ती ठरविणे गरजेचे असते. म्हणून प्रस्तुत संशोधनात अध्ययन करण्यासाठी नांदेड जिल्ह्याची निवड केली आहे. हे अध्ययन नमूना सर्वेक्षणावर आधारित असून नांदेड जिल्ह्याच्या १६ तालुक्यांमध्ये ग्रामीण बेरोजगारीचे प्रमाण किती आहे? याचा अभ्यास केला जाईल. ही बेरोजगारी कमी करण्यासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी कशी केली जाते, या योजनेअंतर्गत ग्रामीण भागात कोणत्या प्रकारची कामे हाती घेतली जातात, त्या माध्यमातून रोजगार निर्मिती व ग्रामीण भागाचा विकास कितपत झालेला आहे, योजनेच्या अंमलबजावणीत शासकीय यंत्रणेची कार्यप्रणाली इ. चे अध्ययन केले जाईल.

१.७.२ संशोधनाची मर्यादा :-

प्रस्तुत अध्ययन ग्रामीण समुदायातील बेरोजगारी व योजनेअंतर्गत केली जाणारी विकासकामे या अनुषंगाने केले जाणार आहे. मानवी वर्तनाच्या संशोधनात काही मर्यादा येतात. प्रस्तुत संशोधनाच्या पुढील मर्यादा असतील.

१) प्रस्तुत संशोधन हे नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण बेरोजगारीशी संबंधित आहे. त्यामुळे हे संशोधन शहरी बेरोजगारीशी संबधित असेलच असे नाही.

२) प्रस्तुत संशोधन हे नांदेड जिल्ह्याच्या १६ तालुक्यातील ५ गाव याप्रमाणे ८० गावांच्या अभ्यासावर आधारीत आहे.

३) तसेच प्रस्तुत संशोधन सन २००९ ते सन २०१९ या कालावधीपुरतेच मर्यादित राहिल.

४) प्रस्तुत संशोधन गैरसंभाव्यता नमूना निवड पद्धतीचा अवलंब करून केले जाईल. त्यामुळे इतर नमूना निवडीची पद्धत वापरण्यावर मर्यादा येईल.

५) काम करण्याच्या दृष्टीने 'सक्षम असलेल्या व्यक्तींना त्यांच्या क्षमतेनुसार व पात्रतेनुसार काम मिळणे म्हणजे रोजगार होय' या व्याख्येनुसार १८ ते ५९ वर्ष वयोगट अभ्यासासाठी निवडला जाईल.

१.८ संशोधन आराखडा :-

एफ.एन.करलिंगर यांनी म्हटल्यानुसार 'संशोधन आराखडा संशोधनाची एक योजना, संरचना आणि एक रणनीती आहे ज्याद्वारे संशोधन प्रश्नांची उत्तरे प्राप्त केली जातात आणि भिन्नत्व प्रसरणावर नियंत्रण ठेवले जाते.' या दृष्टीने संशोधनासाठी आराखड्याचे महत्त्व आहे. संशोधनाला निश्चित दिशा व आकार प्रदान करण्यासाठी व वेळ, श्रम व पैसा यांची बचत करण्यासाठी उद्देशानुरूप संशोधन आराखडा निश्चित करणे आवश्यक ठरते. म्हणून प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा वापर केला जाईल. कारण या आराखड्यात तथ्य संकलनासाठी वैज्ञानिक तंत्राचा उपयोग करून वस्तुनिष्ठ तथ्ये संकलित केली जातात. वर्णनात्मक संशोधन आराखड्यात मुलाखत, प्रश्नावली, निरीक्षण, सामुदायिक रेकॉर्ड इ. तथ्य संकलनाच्या तंत्राचा समावेश केला जातो.

१.९ नमूना निवड :-

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी गैरसंभाव्यता नमूना निवड प्रकारातील सहेतूक नमूना निवड पद्धतीचा वापर केला जाईल. प्रस्तुत संशोधन विषयाची व्याप्ती नांदेड जिल्ह्यापुरती आहे. नांदेड जिल्ह्यात समाविष्ट असलेले १६ तालुक्यातील प्रत्येकी ५ गावे सहेतूक पद्धतीने निवडले

जातील व या गावातील प्रत्येकी ३ मजुरांची नमूना म्हणून यादृच्छिक पद्धतीने निवड केली जाईल. या प्रातिनिधीक नमून्यांकडून प्राप्त माहितीच्या आधारे तथ्य संकलन करण्यात येईल.

१.१० तथ्य संकलन :-

कोणत्याही सामाजिक संशोधनाची सुरुवात ही तथ्य संकलनापासूनच होते. संशोधन हे वस्तुनिष्ठ तथ्य संकलनावर अवलबून असते. तथ्याच्या आधारावरच निष्कर्ष मांडले जातात. म्हणून संशोधन कार्यात तथ्य संकलन ही महत्त्वाची पायरी आहे. प्रस्तुत संशोधनात तथ्ये संकलित करण्यासाठी प्राथमिक स्त्रोत व दुय्यम स्त्रोत या दोन्ही स्त्रोतांचा वापर करण्यात येईल.

१.१०.१ प्राथमिक स्त्रोत :-

प्रस्तुत संशोधनात तथ्ये संकलित करण्यासाठी प्रामुख्याने मुलाखत अनुसूचीचा वापर करण्यात येणार आहे. कारण, ही पद्धत प्राथमिक तथ्य संकलन करण्यासाठी सर्वसमावेशक असून या पद्धतीद्वारे शास्त्रशुद्ध व मौलिक तथ्यसंकलन करता येऊ शकते. याशिवाय गरजेनुसार प्रश्नावली व काही बाबतीत सहभागी निरीक्षण या पद्धतीद्वारेही प्राथमिक तथ्यांचे संकलन केले जाईल.

१.१०.२ दुय्यम स्त्रोत :-

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेसंदर्भात सखोल माहिती घेण्यासाठी दुय्यम स्त्रोतांचाही मोठ्या प्रमाणात वापर योजनेसंदर्भात शासनाचे वेळोवेळी प्रसिद्ध झालेले जी.आर., परिपत्रके, योजनासंदर्भात शासकीय पुस्तके इतर दस्ताऐवज तसेच संदर्भग्रंथ, मासिके, संशोधन लेख, दैनिक वर्तमानपत्रे, वार्षिक अहवाल, जनगणना अहवाल याशिवाय भ्रमणध्वनी, विविध संकेतस्थळे इ. दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात येणार आहे.

१.१०.३ तथ्यांचे वर्गीकरण व विश्लेषण :-

संशोधकाने संशोधनासाठी संकलित केलेली तथ्ये अस्पष्ट, विस्तृत व अस्ताव्यस्त स्वरूपात असतात. अशा विस्तृत व विखुरलेल्या तथ्यांच्या आधारे विश्लेषण करणे कठीण कार्य असते. वर्गीकरण ही अशी प्रक्रिया आहे की, ज्याद्वारे संकलित तथ्यांना समानता किंवा भिन्नतेच्या आधारे काही निश्चित वर्गात विभाजित केले जाते. प्रस्तुत संशोधनातही वरीलप्रमाणे संकलित तथ्यांचे वर्गीकरण केले जाईल. तथ्य संकलनासाठी मुलाखत अनुसूची तयार करून त्याआधारे तथ्य संकलन केले जाईल. वेगवेगळ्या निकषाच्या आधारे वर्गीकरण केले जाईल.

१.११ तथ्यांचे सांकेतीकरण :-

उपलब्ध झालेल्या माहितीचे संख्यात्मक विवेचन करता यावे म्हणून प्राप्त उत्तरांना संकेतन करावे लागते. मोठमोठ्या वर्णनात्मक उत्तरांना विवक्षित संकेत किंवा प्रतिके देणे म्हणजे सांकेतिकरण होय. प्रस्तुत संशोधन करताना मुलाखत अनुसूचीचा वापर करून मिळालेल्या तथ्यांचे सांकेतीकरण केले जाईल. अंक तसेच अक्षरांच्या आधारे सांकेतीकरण केले जाईल. यामुळे उत्तरांचे वर्गीकरण करणे सुलभ होईल.

१.१२ तथ्यांचे सारणीकरण :-

सामाजिक संशोधनासाठी संकलित कलेल्या तथ्यांना किंवा आकड्यांना सुव्यवस्थित व सरळ स्वरूपात प्रस्तुत करणे म्हणजे सारणीकरण होय. सारणीला वर शीर्षक देऊन व्यापक तथ्यांना संक्षिप्त सुटसुटीत स्वरूपात मांडले जाते. प्रस्तुत संशोधनात सारणीकरण केले जाईल. जेणेकरून (१) किचकट तथ्ये सहज लक्षात येतील. (२) त्यांची तूलना करणे शक्य होईल. (३) विविध तथ्यांतील आंतरसंबंध माहित होतील. सारणीच्या आधारावर विविध प्रकारचे आलेख, नकाशे काढले जातील.

१.१३ तथ्यांचे निर्वचन :-

तथ्यांचे विश्लेषण व त्यानंतर निर्वचन केल्याशिवाय संशोधन कार्य अपूर्ण असते. वरीलप्रमाणे तथ्यांचे वर्गीकरण, सांकेतीकरण, सारणीकरण झाल्यानंतर तथ्यांमधील सहसंबंधाचा अभ्यास करून त्यानंतर निष्कर्ष काढले जातील.

१.१४ गुणात्मक अध्ययन (व्यष्टी अध्ययन) :-

प्रस्तुत संशोधनात संख्यात्मक तथ्यांबरोबर गुणात्मक तथ्ये संकलित करण्यासाठी काही व्यष्टी घटकांचे अध्ययन करण्यात येईल. यात भिन्न चार व्यष्टी घटक असे असतील जे या योजनेचे लाभार्थी असतील व बेरोजगार या गटातील असतील. दोन अध्ययन घटक स्थानिक स्वराज्य संस्थेतील व दोन अध्ययन घटक जिल्हाधिकारी कार्यालयातील अंमलबजावणी करणारे अधिकारी किंवा कर्मचारी असतील. गुणात्मक अध्ययनामुळे संशोधनाची विश्वसनियता व वस्तुनिष्ठता वाढत असते. म्हणून व्यष्टींचे अध्ययन केले जाईल.

१.१५ संशोधनाची प्रकरणरचना :-

प्रकरण पहिले - प्रस्तावना

प्रकरण दुसरे - संदर्भसाहित्याचा आढावा व संशोधनपद्धती

प्रकरण तिसरे - संशोधन विषयाचे अर्थनिर्वचन

प्रकरण चौथे - गुणात्मक अध्ययन (व्यष्टी अध्ययन)

प्रकरण पाचवे - गृहितकृत्यांची पडताळणी व सैद्धांतिक दृष्टिकोनाची मांडणी

प्रकरण सहावे - संशोधन निष्कर्ष व उपाययोजना

१.१६ संदर्भसूची :-

१) घाटगे बालासाहेब, वावरे अनिलकुमार, २०१०, 'भारतीय अर्थव्यवस्था', निराली प्रकाशन, पुणे.

२) रायखेलकर ए.आर., दामजी बी.एच., २०१०, 'भारतीय अर्थव्यवस्था', विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.

३) भंडारे वसुधा, २०१८, 'संशोधन पद्धती', टिळक विद्यापीठ, पुणे.

४) स्टडी सर्कल रिसर्च ब्युरो, २०१३, महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा, स्टडी सर्कल पब्लिकेशन्स प्रा.लि., मुंबई.

५) आयुक्त, (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना), २०१३, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना मार्गदर्शक सूचना, आयुक्तालय, नागपूर.

६) www.censusindia.gov.in

७) https;//mahaegs.maharashtra.gov.in

संशोधक
प्रेमकुमार माधवराव कौशल्ये
एम.ए.(सेट), बी.एड्.

मार्गदर्शक
प्रा.डॉ. बी.आर.भोसले
सहयोगी प्राध्यापक,
यशवंत महाविद्यालय, नांदेड